**विशेष दिवाणी दावा क्र. १४८/२०२१**

निशाणी २८ लगत

**(सदर साक्ष न्यायालयाच्या टी.व्ही वर प्रक्षेपित करण्यात आली.)**

**प्रतिवादी क्र. ३ तर्फे विधिज्ञ वकिल श्री. एस.के. राणे यांचेमार्फत वादी यांचा उलटतपास पुन्हा शपथेवर सुरू....)**

या दाव्याच्या कामी मी माझ्याव्यतिरिक्त इतर साक्षीदार तपासणार आहे. लक्ष्मण व काशिनाथ आरिवले असे साक्षीदार तपासणार आहे. त्यांना आमच्या वतीने तपासणार आहे. सदरच्या दाव्यामध्ये सर्व्हे नं. ४३/४, ११३/२ व १८/५ या मिळकतीमध्ये मी माझा हिस्सा मागितला नाही. सदरचा दावा केवळ ज्या दावा मिळकती प्रतिवादी क्र. ३ यांना विक्री केलेल्या आहेत त्याबाबतचा केला आहे. योगेश फाळके यांना दिलेले कुळअखत्यारपत्र मी वाचून पाहिलेले नाही. योगेश फाळके विरूध्द मी दावा दाखल केलेला नाही. आता मला दि. ०५/०२/२००८ रोजीचे दावा मिळकतीसंदर्भातील खरेदी खत क्र. १५७९/२००८ चे खरेदीखताचे प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. त्यासोबत अखत्यारपत्र देखील असून ते दाखविण्यात आले. त्या अखत्यारपत्रामध्ये अखत्यारी योगेश फाळके यांना खरेदी खत लिहून देण्याचे व नोंदणीकृत करून देण्याचे अधिकार नमूद आहे. सदरचे कागदपत्र प्रमाणित प्रत असून उलटतपासामध्ये दाखविण्यात आले असून त्यास **निशाणी ३५** देण्यात येत आहे. सदर कागदपत्राला निशाणी देण्यास प्रतिवादीचे वकीलांची हरकत नाही. हे मला सांगता येणार नाही की, विक्री परवानगीचे मिळणेचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांनी स्वत: केला होता किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या प्रतिज्ञापत्रातील मजकूराप्रमाणे सन २००८ मध्ये मला पैसे मिळणार होते याची मला माहिती होती. सन २००८ ला पैसे मिळाले किंवा नाही अशी कोणतीही चौकशी माझ्या आजीने केली नाही. वादी यांना किती उर्वरित रक्कम दयायची होती याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या प्रतिज्ञापत्रामध्ये म्हटल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादींना हिस्सा दयायचा होता. हे म्हणणे खरे आहे की, माहिती मिळाल्यानंतर देखील किती पैसे देणे लागत होते याबद्दल कंपनी यांना माझ्या आजीने किंवा लक्ष्मण व काशिनाथ यांनी पत्रव्यवहार केला नाही. हे मला सांगता येणार नाही की, ६६ लाख हा मोबदला केवळ काशिनाथ व लक्ष्मण यांनी स्वीकारला किंवा कसे. हे मला सांगता येणार नाही की, सदरचा मोबदला स्वीकारल्यामुळे काशिनाथ व लक्ष्मण यांनी कंपनीच्या नावे अखत्यारपत्र लिहून दिले किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, जे अखत्यारपत्र लिहून दिलेले आहे त्याआधारे कायदेशीररित्या खरेदीखत नोंदणीकृत केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, साठेकरार व अखत्यारपत्र रद्द करण्यासाठी मागणी सदरच्या दाव्यामध्ये केलेली नाही. ८ क्रमांक १४ चे उल्लंघन झालेले असल्याबाबत मी जे

नमूद केले आहे त्याबाबत मला स्वत:ची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजीचा वारसाहक्काप्रमाणे दावा मिळकतीत कोणताही हक्क नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजीचा कुठलाही हिस्सा लागत नसल्यामुळे सन २००८ पर्यत माझ्या आजीने किंवा वडीलांनी दावा मिळकतीबाबत कुठलाही वाद उपस्थित केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजीला सन २००५ साली माझ्या मामाने जो हिस्सा दिला होता त्याची माहिती मला २००५ साली झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती खरेदी करण्यापूर्वी १९५६ पासून २००८ पर्यंत दावा मिळकती प्रतिवादी क्र. १ व २ यांच्याच नावे होत्या.

**प्रश्न:-** प्रतिवादी क्र. १ व २ हे मालक आहेत ते पाहण्याकरीता कंपनीकडून पेपर नोटीस देण्यात आली होती त्याला आम्ही कोणत्याही प्रकारे हरकत घेतली नव्हती?

**उत्तर:-** आम्हांला त्याबाबत माहिती नव्हती.

**प्रश्न:-** तुम्ही सन २००८ मध्ये खरेदीखत झाल्यानंतर कुठल्याही प्रकारची हरकत घेतली नव्हती?

**उत्तर:-** सन २०२१ मध्ये माहिती झाल्यानंतर आम्ही हरकत घेतली.

हे म्हणणे खरे नाही की, या मिळकती यापूर्वीच विक्री केल्याचे माझ्या आजीला, वडीलांना माहिती होते. हे म्हणणे खरे नाही की, मी, माझे काका व प्रतिवादी क्र. १ व २ यांनी सन २०२१ पासून संगणमत करून कारवाई चालू केली. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा दावा दाखल करण्याचा मला कोणताही हक्क नाही व आजीच्या वतीने पुरावा देण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला दाव्याची माहिती नसतांना शपथेवर खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, कंपनीसोबत झालेले खरेदीखत कायदेशीर असून ते रद्द करून मागण्याचा मला कोणताही अधिकार नाही.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती

UMA YASH BORADE KAPOOR

Digitally signed by UMA YASH BORADE KAPOOR
Date: 2026.03.13 11:46:04 +0530

दि. १२/०३/२०२६

**(उमा वाय. बोराडे -कपूर)**

४ थे सहदिवाणी न्यायाधीश व स्तर, पनवेल